# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेस नोट ता. १२/१२/२०१९

### ATM मशीन फोडुन ATM मधुन पैसे चोरण्याचा प्रयत्न करणारे आरोपी यांना चिखली पोलीसांनी ०५ तासात जेरबंद करुन गुन्हा उघडकिस आणला
### चिखली पोलीस ठाणे कडील तपास पथकाची कामगीरी

-----------------------------------------------------------------------------------------

चिखली पो.ठाणे गु.र.नं.६९५/२०१९ भा.दं.वि.कलम ३८०, ४२७, ५११ या गुन्ह्यातील अज्ञात आरोपीचा शोध घेणेकामी आम्ही स्वतः पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री गणेश जवादवाड, पोउपनिरी. संदीप बागुल, पोहवा. ४७८ गर्जे, पोहवा. १३९ गायकवाड, पोहवा. १७७ चव्हाण, पोहवा. ३११ कडलग, पो.शि. १८५६ पिंजारी असे चिखली पोलीस ठाणेचे हद्दीत पेट्रोलिंग फिरत असताना पोउपनिरी. संदीप बागुल यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की रात्रौ चिंचेचामळा म्हेत्रेवस्ती येथील ATM फोडणारे इसम हे आण्णा म्हेत्रे चाळ म्हेत्रे वस्ती याठिकाणी भाड्याने खोली घेवुन रहात आहेत. अशी बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी जावुन मिळालेल्या फुटेजमधील वर्णनाप्रमाणे खात्री केली असता सदर ठिकाणी तीन इसम मिळुन आले. त्यांना स्टाफसह ताब्या घेवून चिखली पोलीस ठाणे येथे घेवून येऊन त्यांच्याकडे सदर गुन्ह्याबाबत कसुन तपास करता त्यांची नावे १) विष्णु प्रसाद चौधरी वय २६ वर्ष रा. आण्णा चाळ चिंचेचा मळा मोरेवस्ती चिखली पुणे मुळगाव रा. कैलाली जि. जोशीपुर नेपाळ २) श्याम बाबुराम राणा वय १९ वर्ष रा. आण्णा यांची चाळ हनुमान म्हेत्रे यांच्या घरी मोरेवस्ती चिखली पुणे मुळगाव ध्यानपुर ता. पालिया जिल्हा लखीनपुर खेरी राज्य उत्तर प्रदेश ३) राजेंद्रकुमार जोगीराम राणा वय २६ वर्ष रा. आण्णा यांची चाळ हनुमान म्हेत्रे यांच्या घरी मोरेवस्ती चिखली पुणे मुळगाव गुवरोल ता. पालिया जिल्हा लखीनपुर खेरी राज्य उत्तर प्रदेश अशी असून त्यातील अ.नं. १ विष्णु लालबहादुर चौधरी यास गावाकडे जाणेसाठी पैशाची गरज भासल्याने त्यांनी तिघांनी मिळुन चिंचेचा मळा येथील ICICI बँकेचे एटीएम फोडण्याचा प्रयत्न केला. अशी गुन्ह्याकेल्याची कबुली दिल्याने त्यांना दाखल गुन्ह्यात अटक केली आहे. अधिक तपास सहा. पोलीस निरीक्षक मस्के, चिखली पोलीस ठाणे अधिक तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त संदीप बिष्णोई, मा. सह पोलीस आयुक्त प्रकाश मुत्याल, मा. अपर पोलीस आयुक्त रामनाथ पोकळे, मा. पोलीस उपआयुक्त विनायक ठाकणे, मा. सहा. पोलीस आयुक्त संजय नाईक पाटील, यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) गणेश जवादवाड, पोलीस उपनिरीक्षक संदीप बागुल, पोहवा. बाबा गर्जे, मंगेश गायकवाड, आनंद चव्हाण, संभाजी कडलग, पो.शि. कबिर पिंजारी या पथकाने केली आहे.